महामंडलेश्वर

**स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे**

**सत्संग - प्रवचन**

# सद्‌गुरु वचनांमृताने मुक्ती



***(प्रथम आवृत्ती)***

- प्रकाशक -

ॐ परमानंद प्रकाशन

**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**

भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)

दुरध्वनी :

किंमत : दहा रुपये (१०/-)

## निवेदन

**सद्‌गुरु मिले जू सब मिले न तो मिला न कोय ।**
**माता पिता सूत बांधवा ये तो घर घर होय ।।**

जीवनामध्ये सद्‌गुरुची प्राप्ती अत्यंत दुर्लभ आहे. जसे कबीर महाराज म्हणतात जीवनामध्ये माता-पिता मूले,बंधू आदि तर घरा घरात बहुतेक सर्वांना मिळतात. हे सर्व मिळाल्यानंतर विशेष लाभ होतोच असे नाही. परंतु जीवनामध्ये ज्या वेळेस खरे सद्‌गुरु मिळतात त्या वेळेस केवळ त्याचेच जीवन धन्य होते असे नाही तर त्यांच्या सानिध्यात येणाऱ्यांचे जीवनदेखील धन्य होऊन जाते.

असेच एक **सद्‌गुरु महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज** ज्यांच्या सानिध्यात येणाऱ्या लाखो साधकांचे जीवन धन्य झालेले आहे.

स्वामीजी स्वतःच एक सद्‌गुरु असल्यामुळे त्यांच्या मुखातून **''सद्‌गुरु वचनामृताने मुक्ती''** हे प्रवचनामृत खरोखरच केवळ श्रवण करण्यासारखेच नव्हे, तर आत्मसात करण्यासारखे आहे.

इतरांप्रमाणेच आपले व आपल्या सानिध्यात येणाऱ्यांचे जीवन धन्य होऊन जावे यासाठी सद्‌गुरु वचनांमृताने मुक्ती हे सत्संग प्रवचनांमृत लिखित स्वरुपात आपल्या हातात देतांना खरोखरच आम्हास अपार हर्ष होत आहे.

प्रकाशक

**सद्गुरु वचनाचे करी अमृतपान । जन्म-मृत्यू जाण नासतील ।।१।।**
**होसी तू अमर स्वामी इंद्रियांचा । मने काया वाचा शरण जाई ।।२।।**
**सद्गुरुचे तीर्थ अमृताची वाटी । नित्य सेवी तुटी नको आणू ।।३।।**
**बहेणी म्हणे जीवी होसील संतूष्ट । सद्गुरु वरीष्ट पुजलीया ।।४।।**

◆ ◆ ◆ ◆ ◆

**सद्गुरुचा महिमाः**

या अभंगाचे उच्चारण करण्यापूर्वी म्हणजेच सत्संग-प्रवचन सुरू करण्यापूर्वी आपणास कबीर महाराजांचा एक दोहा सांगितला होता.

**तिरथ नहाये एक फल । साधू मिले फल चार ।**
**सद्गुरु मिलै अनंत फल । कहत कबीर विचार ।।**

तीर्थामध्ये स्नान केल्याने तीर्थावर श्रद्धा असेल आणि तीर्थाचे पाणी शुद्ध असेल तर अंतःकरण किंवा शरीरशुद्धी रूपी एक फळ मिळते. तिर्थापेक्षा जास्त फळ संताच्या सानिध्यात गेल्याने त्यांचा उपदेश श्रवण केल्याने व त्याचे जीवनात पालन केल्याने धर्म, अर्थ, काम आणि मोक्षरुपी असे चार फळे मिळतात. परंतु जे सद्गुरुच्या सानिध्यात जातात, त्यांचा उपदेश श्रवण करतात आणि जीवनामध्ये त्याचे पालन करतात तर त्यांना अनंत फळाची ज्यांची गणना होऊ शकत नाही, असे विविध प्रकारच्या फळाची प्राप्ती होते. असे खूप विचारपूर्वक संत कबीर महाराज म्हणतात.

अनंत किंवा विविध प्रकारचे फळे कोणकोणती मिळतात? अशी जिज्ञासा काहींच्या मनात निर्माण होऊ शकते.

या जिज्ञासा पूर्तीसाठी संत बहिणाबाईच्या या अभंगात सद्गुरूच्या सानिध्यात काय लाभ आहे किंवा सद्गुरुचा काय महिमा आहे हे या अभंगात सांगण्यात आले आहे.

संत बहिणाबाई या अभंगाच्या प्रथम चरणामध्ये म्हणते की,



जो सद्गुरू वचनामृताचे सेवन करतो तो जन्म-मृत्यूच्या अतित होतो. म्हणजेच सद्गुरू वचन अमृतासमान माणून जो एकतो त्याचे जीवनात पालन करतो, म्हणजेच त्याअनुसार जीवन जगतो तो जन्म-मृत्यूच्या चक्रापासून मुक्त होतो म्हणजेच मोक्ष प्राप्त करतो.

अभंगाच्या दुसऱ्या चरणामध्ये संत बहिणाबाई म्हणते की, अशा प्रकारे अमर होण्यासाठी, मुक्त होण्यासाठी आणि इंद्रियांचे स्वामी होण्यासाठी मनाने, कायेने, वाचेने सद्गुरूला शरण गेले पाहिजे. या संसारामध्ये जीव इंद्रियांचा गुलाम झालेला आहे म्हणून दुःख भोगत आहे आणि मृत्यूनंतर वारंवार जन्म आणि मृत्यूच्या चक्रामध्ये भ्रमण करत आहे. जीव सद्गुरूला शरण जात नाही आणि कोणी जातो तर पहिले वाणीने नंतर कुणी विरळा कायाने आणि कुणी त्यापेक्षा विरळा मनाने सद्गुरुला शरण जातो. म्हणून जो लाभ मिळायला पाहिजे तो मिळत नाही. म्हणून शरण जाण्याचा जो क्रम संत बहिणाबाईने सांगितलेला आहे तो हा की, पहिले मनाने, नंतर शरीराने आणि शेवटी वाणीने शरण जायला पाहिजे. परंतु बरेच जण उलटा क्रम करतात म्हणून जो लाभ व्हायला पाहिजे तो होत नाही.

म्हणून तो लाभ मिळण्यासाठी तिसऱ्या आणि चौथ्या चरणामध्ये संत बहिणाबाई म्हणते, पूर्ण श्रद्धेने सद्गुरुचे पूजन, नित्य तिर्थामृताचे प्राशन अत्यंत आवश्यक आहे. म्हणून सर्वात वरिष्ठ जे सद्गुरु आहे त्यांचे पूजन केल्याने, वचनांमृताचे सेवन केल्याने या जगतात जीव संतुष्ट होतो आणि जन्म-मृत्यूच्या चक्रापासून मुक्त होतो.

येथे एक शंका मनामध्ये निर्माण होण्याची संभावना आहे ती ही की, येथे संत बहिणाबाईने सद्गुरूला वरीष्ठ म्हणजेच सर्वात श्रेष्ठ का म्हणते? या प्रश्नाच्या समाधानासाठी एवढेच म्हणता येईल,

की, सद्‌गुरु सर्वात श्रेष्ठ आहेच केवळ संत बहेणाबाईनेच नव्हे तर कबीर महाराजांनी देखील '' **सद्‌गुरु मिले अनंत फल** '' ही अनुभूती जाणून सद्‌गुरुला सर्वात श्रेष्ठ, वरीष्ठ सांगितले. संत एकनाथ महाराज देखील म्हणतात की या संसारामध्ये सर्वात श्रेष्ठ म्हणजे ब्रह्मापेक्षाही वरीष्ठ सद्‌गुरु आहे ते आपल्या अभंगामध्ये म्हणतात...

**परब्रम्ह राम वशिष्ठा शरण । कृष्ण सांदिपणी गुरु केला ।।**

परब्रम्ह राम वशिष्ठासारख्या सद्‌गुरुला आणि भगवान श्रीकृष्ण सांदिपनीसारख्या सद्‌गुरूला शरण गेले आणि ब्रह्मविद्या प्राप्त करून घेतली. म्हणून ते दोन्ही जगामध्ये वंदनिय झाले. असे सांगितल्यानंतर येथे एक शंका मनामध्य निर्माण होऊ शकते की, दोन्ही अवतारी भगवंत होते म्हणून ते वंदनिय झाले. परंतु जर कोणी पापी सद्‌गुरूला शरण गेला तर तो वंदनिय होऊ शकतो का? अवश्य होऊ शकतो. जसे संत एकनाथ महाराज आपल्या अभंगामध्ये म्हणतात...

**वाल्मिका उपदेशी नारद तो मुनी । वंद्य त्रिभूवनी झाला वाल्हा ।।**

महान पापी वाल्ह्या कोळी नारद मुनीसारख्या सद्‌गुरुला शरण गेल्यामुळे, त्यांचा उपदेश पालन केल्यामुळे वंदनिय झाले. म्हणून सद्‌गुरुला शरण गेले पाहिजे. त्यांचे उपदेशामृत सेवन केले पाहिजे. ज्यामुळे या संसारामध्ये सुख, समाधान संतुष्टी मिळेल व अंती मोक्ष प्राप्त होईल.

हे सर्व श्रवण केल्यानंतर मनामध्ये अजून एक प्रश्न निर्माण होऊ शकतो, येथे जे लाभ सांगितलेले आहे आणि या संत बहेणाबाईच्या अभंगामध्ये जे शब्द आलेले आहे ते सर्व सद्‌गुरु शब्द आलेले आहे. तर सद्‌गुरु आणि गुरु यामध्ये अंतर असते का? याचे उत्तर हेच आहे की, सद्‌गुरू आणि गुरु यामध्ये खूप मोठे अंतर आहे. या जगामध्ये गुरु तर जागोजागी आणि घरोघरी मिळतात परंतु सद्‌गुरू अत्यंत दुर्लभ असतात. जसे समर्थ रामदास स्वामी म्हणतात...



**गुरुचे लक्षणेः**

**एक गुरु एक मंत्र गुरू । एक यंत्र गुरु एक तंत्र गुरु ।**
**एक वस्ताद गुरु एक राजगुरु । म्हणती जनी ।।**

एक केवळ नावाचेच गुरु असतात. गुरुचे त्यांच्याजवळ कोणतेच लक्षण नसते. बऱ्याच वेळेस त्यांना लोक उपहासपूर्वक गुरु म्हणत असतात. जसे एका ठिकाणी बघितले की, जे विड्या, सिगरेट, तंबाखू विकतात त्यांना गुरु म्हणतात. त्यांच्या कडून बिडी सिगारेट घेतात आणि विचारतात, क्यों गुरु करू शुरू अशा गुरुकडून विडी, सिगारेट घेऊन त्यांची परवानगी घेऊन विड्या, सिगरेट पिल्याने काय आपला उद्धार होणार आहे? अशाने तर जीवंतपणी दुःख आणि मृत्यूनंतर नरक प्राप्त होतो. काही मंत्र गुरु असतात. म्हणजे एखादा मंत्र कुठून तरी त्यांनी ऐकलेला असतो किंवा वाचलेला असतो ते तो मंत्र दुसऱ्याला सांगत फिरतात. त्या मंत्राचे बीज, न्यास त्यांना काहीही माहीत नसते. तसेच त्यांनी तो मंत्र सिद्धही केलेला नसतो. त्यांना म्हणतात मंत्र गुरु. काही यंत्र गुरु असतात म्हणजे त्यांना बिसा आदी यंत्राचे थोडे ज्ञान असते एखादे यंत्र करून देतात व ते गळयात किंवा दंडात बांधायला सांगतात त्यांना यंत्र गुरु म्हणतात. काही तंत्र गुरु असतात तंत्र गुरु म्हणजे तांत्रिक साधना करतात. जसे काही काळे कपडे वापरतात. स्मशानामध्ये राहतात तेथेच जेवतात कधी कधी एखाद्या प्रेतावरती बसून तांत्रिक साधना करतात. अमंगल वेष, अमंगल खाने, अमंगल राहणे व अमंगल कृत्य यालाच ते तांत्रिक साधना मानतात. भूत, प्रेत, पिशाश्च वश करणे हेच जणू त्यांच्या जीवनाचे ध्येय असते. अशी अघोरी साधना करणारे काही तांत्रिक गुरु म्हणजेच तंत्र गुरु असतात. काही वस्ताद गुरु म्हणजे जे पहिलवान आदि असतात जे कुस्त्या आदि शिकवतात त्यांना

त्यांचे शिष्य म्हणतात की, हे आमचे वस्ताद गुरु आहे. त्याचप्रमाणे राजाचे गुरु ते राजगुरु. राज्य कसे चालवावे याचे ज्ञान देणारे राजगुरु असतात. ते फक्त राजाला राज्य करण्याचाच सल्ला देतात.

त्याच प्रमाणे अजून गुरुचे प्रकार सांगतात...

**एक माता गुरु । एक पिता गुरु । एक देव गुरु ।**
**एक बोलीजे जगद्गुरु । सकळ कळा ।।**

आपली आई आपली प्रथम गुरु आहे. आईने आपल्याला जगाची वडिलांची ओळख करून दिली. बरेच काही आपणास आईने शिकविले. त्यामुळे आई आपली गुरु आहे. त्यानंतर सांगतात की पिता गुरु, पिता गुरु म्हणजे आपले वडील आपले गुरु आहे. व दुसरा पिता गुरु म्हणजे जो पिणे शिकवतो. जसे काही या जगात पिता गुरु असतात.जे बिडी, सिगारेट मद्य म्हणजे दारु आदि व्यसनाचे पदार्थ पिण्यास शिकवतात.

जसे आपण बघितले असेल की, ज्याला पिता येत नाही म्हणजे ज्याला विडी, सिगारेट, मद्य पिण्याची सवय नसते अशांना पिता गुरु पिण्याचे शिकवतात. सुरुवातीला एखाद्याला समजा त्यांनी विडी किंवा सिगारेट पिण्यास दिली तर नवीन शिकणारा एक झुरका ओढतो व खाँक खाँक करायला लागतो व तो म्हणतो खूप ठसका लागतो. नाही पिता येत तेव्हा त्याचा पिता गुरु जवळच बसलेला असतो तो म्हणतो पहिल्या वेळेस असेच होत असते. ओढ! त्याचा शिष्य पुन्हा ओढण्याचा प्रयत्न करतो परत त्याला ठसका लागतो व तो म्हणतो आता जमतच नाही त्या वेळेस त्याचा पिता गुरु म्हणतो अरे काय मर्दा ! एका झुरक्यात ठसका लागला आण इकडे ! मी ओढून दाखवितो. तू पहा एका झुरक्यात आर्धी बिडी संपवितो, आणि तोंडाने धूर घेऊन नाकातून काढतो. कुठून कुठून काढतो हे तर बिचारा तोच जाणो. तोंडातून,नाकातून,खालून सर्वच बाजूने तर धूर निघतो. म्हणतात



देखील व्यसनापाई माझ्या संसाराची व देहाची राख रांगोळी झाली. आणि होतेच कारण कचऱ्याच्या ढिगाला अग्नी लागल्यानंतर वरतूनच धूर निघतो असे नाही तर चहू बाजूने धूर निघतो. तसे पिता गुरु म्हणजेच व्यसनी गुरु तर विडी, सिगारेट, दारु, गांजा, भांग, तंबाखू, गुटखा इत्यादींच्या सेवनाने नरकाच्या मार्गाला लागलेलाच असतो व आता इतरांनाही लावतो. म्हणून अशा पिता गुरुच्या सानिध्यात या जगात दुःख व मृत्यूनंतर नरक प्राप्त होतो. म्हणून अशा पिता गुरुच्या सानिध्यात चुकून देखील जाऊ नये.

त्याच प्रमाणे देवतांचे गुरु ते देवगुरु व जगाचे गुरु ते जगद्गुरू असतात. आपले आई-वडील जरी आपले गुरु असले, जगाची ओळख आपणास करून दिली तरी ते सद्गुरु होऊ शकत नाही. जसे समर्थ म्हणतात...

**आपले माता आणि पिता । तेही गुरूची तत्वतः ।**
**परि पैलपार पावविता । तो सद्गुरु वेगळा ।।**

आपले आई-वडिल आपले गुरु आहे परंतु ते आपणास या भवसागरापासून मुक्त करू शकत नाही.भवसागरापासून मुक्त करणारे सद्गुरु वेगळे आहेत.

समर्थ रामदास स्वामी म्हणतात अजूनही गुरु अनेक आहे जसे....

**जो यातिचा जो व्यापार । शिकवीती भरावया उदर ।**
**तेही गुरुपरी साचार । सद्गुरु नव्हेती ।।**

आपल्या जातीप्रमाणे जन्मजात व्यापार जे शिकवितात ते शिकविण्याचा उद्देश हा असतो की पैसा कमवून पोट भरले पाहिजे. असे पोटभरण्याचे शिक्षण किंवा ज्ञान जे देतात ते भलेही गुरु होऊ शकतात.परंतु भवसागरातून तारणारे सद्गुरु होऊ शकत नाही. असे पोटभरण्याची

विद्या शिकविणारे कितीतरी गुरु असतात. जसे समर्थ म्हणतात...

**जे जे यातिचा जो व्यापारु । ते ते त्याचे तितूके गुरु ।**
**याचा पाहता विचारु । उंदड आहे ।।**
**असो ऐसे उंदड गुरु । नाना मतांचा विचारू ।**
**परि जो मोक्षदाता सद्‌गुरू । तो वेगळाची असे ।।**

जाती व्यवसाय, व्यापार शिकविणारे गुरु या जगात उदंड म्हणजे खूपच आहे. ज्यांच्यापासून जे शिकले ते त्यांना म्हणजेच शिकविणाऱ्याला गुरु मानतात. ते भलेही गुरु असेल परंतु सद्‌गुरु होऊ शकत नाही. सद्‌गुरुशिवाय या भवसागरापासून कुणी मुक्त होऊच शकत नाही असे ऐकल्यानंतर काही मुक्त होण्यासाठी चमत्कार दाखविण्याऱ्याला गुरु मानतात. परंतु समर्थ म्हणतात चमत्कार दाखविणारा सद्‌गुरु नसतो.

**जे करामती दाखविती । तेही गुरु म्हणीजेती ।**
**परंतु सद्‌गुरु नव्हेती । मोक्ष दाते ।।**

जे करामती म्हणजेच चमत्कार दाखवितात त्यांना गुरु भलेही म्हणतात. परंतु ते सद्‌गुरु होऊच शकत नाही. चमत्कार होणे व चमत्कार करणे यात खूप मोठे अंतर आहे. काही महापुरुषांच्या जीवनात अगदी सहज चमत्कार होऊन जातात चमत्कार व्हावा अशी त्यांची इच्छा मुळीच नसते परंतू चमत्कार होऊन जातात. आणि काही मुद्दाम चमत्कार करतात. चमत्कार दाखविण्याचा त्यांचा उद्देश जणू काय गारुड्याच्या खेळाप्रमाणे असतो. जसा गारुडी खेळ दाखवितो तसे काही चमत्कार दाखवितात ते सद्‌गुरु होऊ शकत नाही त्यांच्या उपदेशाने मोक्ष मिळणार नाही.

आतापर्यंत आपण गुरुचे लक्षणे ऐकले आता सद्‌गुरुचे लक्षणे श्रवण केले पाहिजे. सद्‌गुरूचे लक्षणे सागतांना समर्थ म्हणतात...



**बिघडले देव आणि भक्त । जीव शिव पणे द्वैत ।**
**तया देव भक्ता एकांत । करी तो सद्‌गुरु ।।**

जीव आणि शिव वस्तूतः दोन्ही एकच आहे. परंतु जीव मायेच्या अधिन झाला. त्यामुळे जीव दुःख भोगत आहे व चौऱ्यांशीच्या चक्रात सापडलेला आहे त्यामुळेच जीव शिवापासून म्हणजेच भगवंतापासून वेगळा झाला. अशा देवापासून म्हणजेच भगवंतापासून वेगळ्या झालेल्या जीवाला सद्‌गुरु परत शिवामध्ये मिळवतात त्याला दुःखापासून व जन्म-मरणाच्या चक्रापासून मुक्त करतात. त्यांना सद्‌गुरु म्हणतात. म्हणजेच....

**प्राणी माया जाळी पाडिले । संसार दुःखे दुखावले ।**
**ऐसे जेणे मुक्त केले । तो सद्‌गुरु जाणावा ।।**

मायाजाळामुळेच जीव संसार चक्रामध्ये म्हणजेच जन्म-मृत्यूच्या चक्रामध्ये सापडून दुःखी होतो. अशा दुःखापासून म्हणजेच जन्म-मृत्यूच्या चक्रापासून जो सोडवितो त्यांना म्हणतात सद्‌गुरु.

अशा जन्म-मृत्यूच्या चक्रापासून सोडविण्यासाठी सद्‌गुरु नेमके काय करतात? तर सद्‌गुरु अनेक प्रकारच्या साधना साधकाकडून शिष्याकडून करून घेतात. त्याच्या इंद्रियाचे दमन व्हावे यासाठी त्या साधना असतात. शिष्याला विवेक सांगतात, म्हणजेच सत्य काय आहे व असत्य काय आहे, काय खावे व काय खाऊ नये, काय प्यावे व काय पिऊ नये अशा प्रकारे खाणे, पिणे, ऐकणे, पाहणे म्हणजेच आचार विचारांवर मर्यादा राहावी यासाठी ते सर्व निर्बंध म्हणजेच नियम असतात.

परंतु कलीयुगामध्ये बरेचसे संत, पंथ, गुरु असे आहे की ते म्हणतात आमची दीक्षा घ्या, तुम्हाला खाण्या-पिण्याचे काहीही बंधन नाही. फक्त आम्हाला दक्षिणा द्या. मग शिष्य मरो, की तरो त्यांना

त्याची काही काळजी चिंता नाही. म्हणून समर्थ म्हणतात...

**शिष्यास न लाविती साधन । न करविती इंद्रीय दमन ।**
**ऐसे गुरु अडक्याचे तीन । मिळाले तरी त्यागावे ।।**

जे गुरु शिष्यास काहीच साधना सांगत नाही. इंद्रियाचे दमन करण्यासही सांगत नाही असे गुरु फुकट मिळाले तरी आपण करू नये. जसे आपण या ठिकाणी बघत आहात की, किती कठोर नियमांचे पालन साधक करत आहेत. इंद्रियांचे मनाचे दमन करत आहेत. सकाळी ब्रह्ममुहर्तापासून तर रात्रीपर्यंत साधना चालू असते. कारण महापुरुषांनी मर्यादा घालून दिलेली आहे, त्या मर्यादेचे पालन केल्याच गेले पाहिजे. केवळ मंत्र, तंत्र उपदेशाने शिष्याची व्यथा, जन्म-मृत्यूची चिंता मिटत नाही. कारण मंत्र तंत्र उपदेश करणारे गुरु तर सर्वत्र आहे परंतु सद्‌गुरु दुर्लभ आहे. भगवान श्रीकृष्ण देखील म्हणतात...

**मंत्र तंत्र उपदेशीते । घरोघरी गुरु आहेत आईते ।**
**जो शिष्यासी मेळवि सद्‌वस्तूते। सद्‌गुरु त्याते श्रीकृष्ण मानी ।।**

मंत्र, तंत्र उपदेश करणारे गुरु तर घरोघरी अगदी आयते जसे रेडिमेड आहे, की ज्यांना जणू गुरु बनण्यासाठी काहीही साधना करण्याची आवश्यकताच भासली नाही. एखादा मंत्र ऐकला आणि तो आता इतरांच्या कानात सांगत फिरतात. त्यांना सद्‌गुरु म्हणत नाही. जे शिष्याला सद्‌वस्तूमध्ये म्हणजे परमात्म्यामध्ये मिळवितात त्यांना भगवान श्रीकृष्ण सद्‌गुरू मानतात. हे सर्व श्रवणकेल्या नंतर एक प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होऊ शकतो की, सद्‌गुरुचे नेमके लक्षणे काय आहे? तर त्यासाठी समर्थ रामदास स्वामी सांगतात....

**मुख्य सद्‌गुरुचे लक्षण । आधी पाहिजे विमल ज्ञान ।**
**निश्चयाचे समाधान । स्वरुप स्थिती ।।**



सद्‌गुरुमध्ये सर्वात पहिले लक्षण कोणते असावे तर ते म्हणजे शुद्ध ज्ञान, आत्म्या परमात्म्याचे ज्ञान जे ज्ञान प्राप्त झाल्यानंतर सद्‌गुरुमध्ये समाधान असते. एवढेच नव्हे तर त्या ज्ञानामुळे त्यांना स्व-स्वरुपाची प्राप्ती होते. ते नेहमी स्व-स्वरूपामध्ये तल्लीन राहतात. त्यानंतर अजून लक्षणे सांगतात...

**याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ती उदास केवळ ।**
**विशेष आचरे निर्मळ । स्वधर्मा विषयी ।।**

सद्‌गुरुमध्ये प्रबळ वैराग्य असते. मोह, ममतेपासून ते मुक्त असतात. त्यांची वृत्ती उदास म्हणजेच पक्षपात रहीत असते. स्वधर्माचे ते विवेक पूर्वक पालन करतात. या पेक्षाही अजून महत्त्वाची लक्षणे सांगतात...

**याहीवरी अध्यात्म श्रवण । हरी कथा निरुपण ।**
**जेथे परमार्थ विवरण । निरंतर ।।**

सद्‌गुरु आध्यात्माचे नेहमी श्रवण करतात. हरीकथा जगाला सांगतात परमार्थ विवरण निरंतरच ते करत राहतात.

हे सर्व लक्षणे परत थोडक्यात सांगायचे झाल्यास समर्थ म्हणतात....

**म्हणोनी ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्म कर्म आणि साधन ।**
**कथा निरुपण श्रवण मनन । निती न्याय मर्यादा ।।**

सद्‌गुरुजवळ आत्मा परमात्म्याचे ज्ञान पाहिजे. इहलोक व परलोकामध्ये जेवढे भोगऐश्वर्याचे प्रलोभन असेल त्याबद्दल मनामध्ये विरक्ती पाहिजे. सद्‌गुरुजवळ भजन पाहिजे. भजन म्हणजे ,..

**सर्व भूत प्रेम युक्ती । तया नाव भजन भक्ती ।बोलीजे उद्धवा ।।**

म्हणजेच सर्व भूतप्राण्याबद्दल प्रेम पाहिजे म्हणजेच...

**कोण्याही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।**

कोणत्याच जीवाचा मत्सर घडता कामा नये. हेच भजन आहे, हीच भक्ती आहे. स्वधर्माचे, स्वकर्माचे पालन केले पाहिजे. साधना करून परमात्मा साध्य करून घेतला पाहिजे. कथा निरुपण केली पाहिजे. श्रवण केली पाहिजे. श्रवणानंतर मनन केले पाहिजे. नितीचे न्यायाचे मर्यादेचे पालन केले पाहिजे.

एवढे लक्षणे सद्‌गुरु जवळ असलेच पाहिजे कारण समर्थ म्हणतात....

**या मध्ये एक उने असे । तेणे ते विलक्षण दिसे ।**
**म्हणोनी सर्वही विलसे । सद्‌गुरु पासी ।।**

आत्ताच जेवढे लक्षणे सांगितले त्यापैकी एक जरी लक्षण नसेल तर ते सद्‌गुरु होऊ शकत नाही. त्यामुळे ज्ञानापासून तर नितीन्याय मर्यादेपर्यंतचे सर्वच्या सर्व लक्षणे सद्‌गुरुमध्ये असणे अत्यंत आवश्यक आहे. सद्‌गुरूला शास्त्रांनी जी निती, न्याय, मर्यादा सांगितलेली आहे ती म्हणजे ....

**आपण आसक्त होऊ नये । केल्याविन सांगू नये ।**
**बहुसाल मागो नये । शिष्यवर्गासी ।।**
**नेणपन सोडू नये । महंत पण धरू नये ।**
**द्रव्यासाठी हिंडो नये । कीर्तन करत ।।**
**लग्न मुहूर्ती जाऊ नये । पोटासाठी गाऊ नये ।**
**मोले कीर्तन करू नये । कोठेतरी ।।**

आपण कुठेच आसक्त होता कामा नये. जे आपण करत नाही, ज्याचा अनुभव आपण घेतला नाही ते दुसऱ्याला सांगू नये. शिष्यवर्गाला अनेक वर्षे मागू नये. ज्ञान सोडता कामा नये. महंतपण धरु नये. द्रव्यासाठी, पैश्यासाठी कीर्तन करत फिरू नये. ज्या ठिकाणी लग्न



असेल तर लग्नाला जाऊ नये. पोटासाठी गाता कामा नये. पैसे ठरवून कीर्तन करू नये. म्हणजेच सद्‌गुरुचा उद्देश व्यापक पाहिजे. निःस्वार्थ भावनेने कोणतेही कार्य केले पाहिजे.

हे सर्व सद्‌गुरुचे लक्षणे किंवा सद्‌गुरु जवळ पाहिजे असलेली मर्यादा सांगण्याचे कारण म्हणजे असे म्हणतात की, '' **ज्यांनी गुरु नाही केला त्याचा जन्म व्यर्थ गेला.** '' ज्यांनी गुरु केला नसेल त्यांचे जीवन व्यर्थ गेले. परंतु ज्यांनी गुरु केला असे देखील चौऱ्यांशीला जातात. त्याचे कारण म्हणजे की, सद्‌गुरुचे लक्षणे न बघता कुणालाही गुरु मानले म्हणजे ज्यांच्याजवळ लक्षणे नाही अशांना गुरु मानले तर आपला उद्धार होणे शक्य नाही. जसे संत कबीर महाराज म्हणतात...

**गुरु किजीए जानिके पाणी पिजै छानी ।**
**बिना बिचारे गुरु करै परै चौऱ्यांशी खाणी ।।**

गुरु म्हणजेच सद्‌गुरु जाणून केले पाहिजे. आता जे सद्‌गुरुची लक्षणे सांगितली ती त्यांच्याजवळ आहे किंवा नाही हे अगोदर बघितले पाहिजे. जर त्यांच्याजवळ सद्‌गुरुचे लक्षणे असेल तरच त्यांना सद्‌गुरु मानले पाहिजे. जसे उदाहरण दिले की, पाणी प्यावयाचे असेल तर जसे पाणी छानून प्यावयास पाहिजे म्हणजे ते पाणी पिण्यायोग्य आहे किंवा नाही याचा अगोदर विचार केला पाहिजे. कारण जसे गंगेचे पाणी आहे जे पवित्र असते त्याच प्रमाणे गटारातील पाणी, मोरीतून, बाथरुम मधून वाहणारे पाणी, पहिल्या धारेचे, दुसऱ्या धारेचे, सरकारमान्य बाटली मधील व विना सरकारमान्य बाटलीमधील पाणी, दुर्गंधयुक्त, विषयुक्त म्हणजेच विषारी पाणी हे सर्व पाणीच आहे, परंतु यापैकी गंगेच्या किंवा इतर शुद्ध पवित्र निर्जंतूक पाण्या व्यतिरीक्त आत्ताच जे अनेक प्रकारचे अशुद्ध,

अपवित्र जंतूयुक्त, दुर्गंधीत पाणी सांगितले ते पिऊन आपले समाधान होणार नाही. पाण्याला जीवन म्हणतात म्हणजे पाणी पिल्याशिवाय जिवंत राहू शकत नाही. म्हणजे पाणी प्याले पाहिजे म्हणजे विषारी पाणी पिऊन तो जिवंत राहतो असेही नाही. म्हणजेच जसे पाणी पिण्यायोग्य आहे किंवा नाही हे बघितले पाहिजे. त्याच प्रमाणे हे सद्‌गुरु आहे किंवा नाही हे बघितले पाहिजे म्हणून सद्‌गुरु कसे पाहिजे याचा विचार-विवेक असलाच पाहिजे. म्हणून लक्षण संपन्न सद्‌गुरु आपण केले पाहिजे संत कबीर महाराज म्हणतात....

**सद्‌गुरु ऐसा किजीए लोभ मोह भ्रम नाही ।**
**दरिया से न्यारा रहे दिसे दरिया माही ।।**

सद्‌गुरु असा करावयास पाहिजे की, ज्यांच्यामध्ये लोभ नाही, मोह, ममता नाही आणि भ्रम नाही. त्याच प्रमाणे जो दरीयामध्ये म्हणजेच संसारामध्ये दिसतो, परंतु संसाराच्या अतीत असतो. म्हणजेच संसारापासून विरक्त पाहिजे. संत बहेणाबाई देखील म्हणते...

**जेथे ज्ञान वैराग्य भक्ती ठसावे।क्षमा शांती देही दया हे विसावे ।**
**दिसे ब्रह्मचर्य स्वअंगासी आले।म्हणे बहेणी तो सद्‌गुरु स्वभावे ।।**

ज्यांच्यामध्ये ज्ञान वैराग्य आणि भक्ती अगदी ठासून भरलेली आहे. क्षमा, शांती दया हे ज्यांच्याजवळ विसावलेली आहे. जे ब्रह्मचारी आहे. '' ब्रह्मआचरती इती ब्रह्मचारी '' ज्यांनी ब्रह्माला जाणले आहे किंवा ज्यांची ब्रह्ममय दृष्टी झालेली आहे असे लक्षण संपन्न सद्‌गुरु आपण केले पाहिजे.

समर्थ रामदास स्वामी देखील म्हणतात....

**जनी भक्त ज्ञानी विवेकी विरागी । कृपाळू मनस्वी क्षमावंत योगी ।**
**प्रभू दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे । तयाचेनी योगे समाधान बाने ।।**



सद्‌गुरु भक्त पाहिजे. म्हणज...

**''भक्त म्हणजे विभक्त नव्हे आणि विभक्त म्हणजे भक्त नव्हे ।।''**

या विचारा प्रमाणे भगवंतासी ते एकरुप झालेले पाहिजे. आत्मा परमात्म्याचे त्यांना ज्ञान पाहिजे. म्हणजे ते ज्ञानी पाहिजे विवेकी म्हणजेच चांगले - वाईट, पाप - पुण्य, धर्म - अधर्म, सद्‌गती - दुर्गती कशामुळे होते याचा विवेक विचार त्यांना असला पाहिजे. कृपाळू म्हणजे....

**'' बुडते हे जग देखवेना डोळा । म्हणोनी कणवळा येतो आम्हा ।। ''**

या विचाराप्रमाणे ते जगावरती शिष्य-साधकावरती कृपा करणारे असले पाहिजे. मनस्वी-म्हणजेच भगवंताचे मनन, चिंतन करणारे पाहिजे. क्षमावंत-म्हणजे त्याच्या मनात क्षमेचा भाव असला पाहिजे. योगी-म्हणजे परमात्म्याच्या प्राप्तीचा योग त्यांना झालेला असला पाहिजे. प्रभू दक्ष व्युत्पन्न चातमर्य जाणे म्हणजेच चतूरता त्यांच्याजवळ असली पाहिजे. परंतु ती चतूरता जगाला फसविण्यासाठी नव्हे तर भगवंताच्या मार्गाला, सन्मार्गाला लावण्याचे चातूर्य त्यांच्या अंगी असावे. असे जर सद्‌गुरु आपणास मिळाले तर आपले कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. आपणास समाधान प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. आपणास समाधान मिळण्यासाठी सद्‌गुरु निष्पाप पाहिजे. निष्पाप भावनेने त्यांनी भक्तीमार्ग चालविला पाहिजे. त्यांच्या मध्ये जर काम, क्रोध, लोभ असेल तर ते आपणास भवसागरातून तारु शकत नाही. जसे संत बहेणाबाई म्हणतात...

**कामाचे विकीले क्रोधाचे जिंकीले । लोभाचे अंकिले सर्व भावे ।।**
**तयासी पुसता काय देती सुख । अंतरी विवेक नाही जया ।।**
**बहेणी म्हणे तेची मायेने ग्रासीले । आम्हा सोडवणे केवी होती ।।**

काम, क्रोध, लोभ आदिपासून शिष्याला सोडविले पाहिजे. परंतु जर गुरुलाच कामाने विकत घेतले असेल, क्रोधाने जिंकले असेल, लोभाने अंकित केले असेल, तर ते शिष्याला या सर्वांपासून कसे सोडवू शकतील? आणि यापासून कसे सुटायचे असे त्यांना विचारल्यानंतर ते काय उत्तर देतील? आणि उत्तर दिले तर त्या उत्तराने आपले काय समाधान होईल किंवा सुख मिळेल? त्यांच्याजवळ विवेक नाही तर ते दुसऱ्याला काय विवेक शिकवतील? आणि तेच जर मोह माया ममतेने ग्रासले गेले असेल, बांधले गेले असेल तर आपणास कसे सोडवू शकतील?

एक शिष्य आपल्या गुरूकडे गेला आणि म्हणाला महाराज माझ्यावर काही कृपा करा. संसारामुळे मी अगदी त्रस्त झालो दुःखी झालो. मुलगा चांगला नाही नेहमी शिव्या देतो काय करावयास पाहिजे? तेव्हा गुरु महाराज म्हणाले. बाबा रे तुझे तर बरे आहे. माझे तर तुझ्यापेक्षाही अत्यंत वाईट हाल आहे. तुझा मुलगा तर फक्त तुला शिव्या देतो माझ्या मुलाने कालच मला मारले तेव्हा मी आता काय करू? तूच या माझ्या मुलाला व त्याच्या आईला समजव. या उत्तराने शिष्याचे काय समाधान होणार आहे? म्हणून मोह मायेने बांधलेल्या गुरुकडून नव्हे तर यापासून मुक्त सद्‌गुरु कडे गेले पाहिजे.

म्हणून जसे कबीर महाराज देखील म्हणतात...

**बंधे को बंधा मिला छुटे कौन उपाय ।**
**सेवा कर निर्बंध की पलमे देय छुडाय ।।**

जो काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर व संसाराच्या मोहमाया जाळापासून सुटलेला असेल त्यांच्या सानिध्यात जा. त्यांची सेवा करा, जेणे करून आपण संसार बंधनापासून मुक्त व्हाल. एक बांधलेला व्यक्ती दुसऱ्या बांधलेल्या व्यक्तीला सोडवू शकत नाही.



एक कथा वाचक गुरु व त्याचे शिष्य शेठ एका सद्‌गुरुकडे गेले व सद्‌गुरुच्या समोर जे दोन खांब होते त्या खांबाला ते टेकून बसले व म्हणाले महाराज बऱ्याच दिवसापासून मी कथा सांगतो व हे शेठ श्रवण करतात. परंतु जीवनात सुख समाधान नाही, दुःखापासून अशांततेपासून मुक्ती नाही. यासाठी काय उपाय करावा? असा प्रश्न विचारल्यानंतर ते सद्‌गुरू म्हणाले आपण नेमके काय करता? व आपणास नेमके काय झाले? तेव्हा ते म्हणाले, जसे आम्ही येथे बसलेलो आहे तसेच आम्ही दररोज खांबाला टेकून बसतो. मी कथा सांगतो व हे शेठ श्रवण करतात. परंतु मला कथा सांगून विशेष अशी दक्षिणा मिळत नाही. शेठचा कथा श्रवण करूनही धंदा चांगला चालत नाही. त्यामुळे दुःखापासून मुक्ती नाही. तेव्हा आम्ही काय करावे? हे ऐकून त्या सद्‌गुरुने त्या दोघांनाही काहीही उत्तर न देता दोन्ही खांबाला दोघांना बांधले व त्यानंतर गुरुला म्हणाले महाराज आपला शिष्य शेठला सोडवा, तेव्हा ते गुरु म्हणाले मी तर बांधलेलो आहे मी कसा सोडविणार त्यानंतर सेठला सांगितले की, आपण गुरुला सोडवा, तेव्हा तेच उत्तर शेठनी देखील दिले.सद्‌गुरु म्हणाले जर एक बांधलेला व्यक्ती दुसऱ्या बांधलेल्या व्यक्तीला सोडवू शकत नाही.त्याच प्रमाणे मोह ममतेनी बांधलेला दुसऱ्या मोह ममतेने बांधलेल्या व्यक्तीला सोडवू शकत नाही.कथा सांगतात कशासाठी तर दक्षिणेसाठी कथा श्रवण करतात, कशासाठी तर धंदा चांगला चालावा यासाठी याने आपणास सुख समाधान मिळणार नाही.

**''बंधे को बंधा मिले। छुटे कौन उपाय ।**
**सेवा कर निर्बध की ।पल मे देय छुडाय ।।''**

म्हणून जे मुक्त असेल असेच सद्‌गुरु आपण केले पाहिजे. जसे आताच सांगितले की...

**सद्गुरु ऐसा किजीए लोभ मोह भ्रम नाही ।**
**दरिया से न्यारा रहे दिसे दरिया माही ।।**

लोभ, मोह, भ्रम यापासून मुक्त असले पाहिजे. जर ते लोभापासून मुक्त नसेल तर काय होते जसे कबीर महाराज उदाहरण देतात...

**गुरु लोभी शिष्य लालची दोनो खेले दाव ।**
**दोनो बुडे बापुडे चढी पाथर की नाव ।।**

गुरु जर लोभी असेल, शिष्य जर लालची असेल तर त्यांचा उद्धार होऊ शकत नाही. त्यांचा तरणोपाय होऊ शकत नाही. जसे दगडाच्या नावेवर बसून कोणी तरू शकत नाही. त्याच प्रमाणे लोभ रुपी नावेमध्ये बसून कोणी तरू शकत नाही. गुरु लोभी असेल व शिष्य लालची असेल तर ते नेहमी डाव खेळत राहतात.

जसे एक गुरु घोडीवर बसून आपल्या शिष्याकडे गेले. नवीनच घेतलेल्या चांगल्या घोडीवर बसून गुरु आलेले बघून शिष्याने त्यांना नवीन घोंगडी बसण्यासाठी टाकली. उद्देश हा की, गुरु आपल्याला काहीतरी देतील. गुरु घोंगडीवर बसले शिष्याने कुशल प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. परंतु गुरुचे सर्व लक्ष नवीन घोंगडीकडे केंद्रित झाले की, घोंगडी चांगली आहे. तेव्हा ती घोंगडी आपल्याला कशी मिळेल याचा विचार ते करायला लागले परंतु शेवटी जातांना घोंगडी घेऊन जा असे शिष्य काही म्हणत नाही हे बघून गुरु ने अंगात आल्याचे नाटक सुरु केले. हुंऽऽ हुंऽऽऽ हुंऽऽऽ

शिष्याने विचारले काय झाले महाराज ?
गुरु महाराज म्हणाले ..... घोंगडी .. घोंगडी.. घोंगडी...
शिष्य म्हणाला घोंगडी पाहिजे ? गुरु म्हणाले हो !
शिष्याने बघितले की, गुरु महाराजांनी तर काही दिले नाही उलट चांगली घोंगडी घेऊन चालले. आता शिष्यही काही कमी चलाख



नव्हता
आता शिष्याच्या अंगात आले. हुंऽऽ हुंऽऽ हुंऽऽऽ
गुरु महाराजांनी विचारले, काय झाले शिष्या?
शिष्य म्हणाला घोडी.. घोडी... घोडी..
गुरु महाराजांनी विचारले, काय घोडी पाहिजे ?
शिष्य म्हणाला हो महाराज.

आता गुरु महाराजांनी घोडी शिष्याला दिली. गुरु महाराजांच्या हातात घोंगडी राहिली. गुरू महाराज विचार करायला लागले कमी किंमतीची घोंगडी आली व जास्त किंमतीची घोडी गेली. आता काय करायचे? त्यांना परत विचार सुचला. त्यांनी परत अंगात आल्याचे नाटक सुरु केले. हुंऽऽ हुंऽऽऽ हुंऽऽऽ
शिष्याने विचारले आता काय झाले महाराज?
गुरु महाराज म्हणाले तुझं तुला. माझं मला. तुझं तुला.. माझं मला.. म्हणून कबीर महाराज म्हणतात...

**गुरु लोभी शिष्य लालची दोनो खेले दाव ।**
**दोनो बुडे बापुडे चढ पाथर की नाव ।।**

म्हणून कबीर महाराज म्हणतात असे गुरु न करता....

**'' सद्गुरु ऐसा किजीए । लोभ मोह भ्रम नहीं ।**
**दरिया से न्यारा रहे । दिसे दरिया माही ।। ''**

म्हणून असे लक्षणे संपन्न सद्गुरु करा व त्यांचे वचनामृत श्रवण करून जीवनात त्याचे पालन करा. म्हणून मूळ अभंगामध्ये संत बहेणाबाई म्हणते .....

**सद्गुरु वचनाचे करी अमृत पान । जन्म मृत्यू जाण नासतील ।।**

जन्म-मृत्यूच्या अतित व्हायचे असेल तर त्यासाठी सद्गुरुचे वचन अमृतासमान माणून त्याचे पालन केले पाहिजे. जर पालन

केले नाही तर महापुरुष सांगतात...

**वेदवचन पितृवचन । जो पाळीना गुरुवचन ।**
**त्यासी होय अधःपतन । तैसे आपण न करावे ।।**

वेदाचे वचन, आई-वडिलांचे वचन, सद्‌गुरूंचे वचन जो पालन करत नाही त्याचे अधःपतन होते. म्हणून आपण वचन पाळले पाहिजे. जो वचन पाळत नाही त्याबद्दल सांगतात...

**गुरू वाक्याचा उल्हासू । नाही जाण केवळ ते पशू ।**
**शिष्या माजी तो रासभवेषू । ज्यासी आळसू गुरु वाक्या ।।**

जो गुरु वाक्याचे पालन करत नाही तो तर पशू समान आहे. गुरु वाक्याचे पालन करण्यामध्ये जो आळस करतो तो शिष्यामध्ये रासभवेष आहे. म्हणजेच गाढव आहे.

म्हणून सद्‌गुरु वचनामृत श्रवण केल्यानंतर काय केले पाहिजे. तर म्हणतात....

**गुरु आज्ञेचे उत्तर । आयकता करावे अतिसत्त्वर ।**
**मुहूर्त पाहे तो पामर । करी विचार तो मूर्ख ।।**

सद्‌गुरूने एखादे सत्कार्य सांगितले असेल तर, ते त्वरित केले पाहिजे. अशा प्रकारे सद्‌गुरु वचनामृताचे जो श्रवण, मनन, चिंतन व निजध्यासन करून पालन करतो, तर त्याला फळ काय मिळते. संत बहेणाबाई अभंगाच्या दुसऱ्या चरणामध्ये म्हणते...

**होशी तू अमर स्वामी इंद्रियांचा । मने काया वाचा शरण जाई ।।**

आपण अमर व्हाल म्हणजे आपणास मृत्यू आता येणारच नाही असे नाही...

**मरो मरो सब कोई कहें । मरणा न जाने कोय ।**
**एक बार ऐसा मरो की । फिर मरणा न होय ।।**

अशी कला आपणास जाणून घ्यायची असेल '' माझे मरण



पाहिले मी डोळा '' अशी अनुभूती घ्यावयाची असेल तर त्यासाठी सद्‌गुरुचे वचनामृत श्रवण करून त्याचे जीवनात पालन केले पाहिजे. अगोदर मनाने नंतर कायेने, वाचेने शरण गेले पाहिजे.शरण गेल्यानंतर त्यांची आज्ञा पाळली पाहिजे. संत कबीर महाराज म्हणतात..

**गुरु को सिरपर रखीये चलिए आज्ञा माही ।**
**कहे कबीर ता दास को तीन लोक भय नाहीं ।।**

गुरू को सिर पर रखीये म्हणजे गुरु वचनाला, गुरु आज्ञेलाच जीवनात सर्वस्व मानले पाहिजे. अशा प्रकारे गुरुच्या आज्ञेने जो जीवन जगतो त्याला त्रैलोक्यात कुठेच भय राहत नाही. म्हणून गुरु आज्ञा पाळली पाहिजे. परंतु जो गुरु आज्ञा पालन करत नाही तर त्याचे काय होते तर संत कबीर महाराज म्हणतात...

**गुरु आज्ञा माने नहीं चलै अटपटी चाल ।**
**लोक वेद दोनो गए आये शिरपर काल ।।**

जो गुरु आज्ञा मानत नाही व अटपटी चाल म्हणजे मनात येईल तसा वागतो, मन मानेल तो व्यवहार करतो. त्याला या जगात सुख नाही व परलोकात सद्‌गती नाही. तो काळाच्या आधीन होऊन चौऱ्यांशीच्या फेऱ्यात भ्रमण करत राहतो.

म्हणून नेहमीच गुरु आज्ञेत राहिले पाहिजे. गुरु आज्ञा, गुरु वचन पाळले पाहिजे. परंतु गुरु आज्ञेत राहणे, गुरु आज्ञा पाळणे ऐवढे सोपे नाही. कारण कबीर महाराज म्हणतात...

**गुरू कुम्हार शिष्य कुंभ है गढी गढी काढे खोट ।**
**अंतर हाथ सहार दे बाहर बाहे चोट ।।**

गुरु आणि शिष्याचा संबंध कुंभार आणि कुंभाराच्या कच्या घड्यासमान आहे. जसे कुंभाराला वाटते की माझा घडा चांगला झाला पाहिजे. बाजारात जर कोणी त्याला वाजवून बघितल तर

फुटू नये. जगाच्या उपयोगासाठी तो आला पाहिजे. त्यासाठी त्याला थापटनीने नेहमी थापटतो त्याच प्रमाणे उन्हात वाळवितो. एवढंच नव्हे तर चांगली भट्टीत भाजतो. हे सर्व करण्यामागे उद्देश हाच असतो की, घडा चांगला झाला पाहिजे.

त्याच प्रमाणे गुरुला देखील हीच अपेक्षा असते की माझा शिष्य चांगला झाला पाहिजे. जगात त्याला कुणी वाईट म्हणू नये. जगाच्या तो उपयोगी आला पाहिजे.

ज्याप्रमाणे कुंभार आपल्या घड्याला थापटत असतो वर किंवा खाली गेलेला भाग चांगला करतो, त्याला पक्क बनवत असतो व त्या साठी तो थापटणीचा उपयोग करतो. थापटणी मारतांना जगाला त्याची थापटणी दिसते. परंतु आतून जो दुसऱ्या हाताचा सहारा दिलेला असतो ज्यामुळे घडा फुटत नाही तो हात अज्ञानाला दिसत नाही.

त्याचप्रमाणे शिष्यामध्ये कामाचे, क्रोधाचे, अहंकाराचे जे दोष असतात. त्या दोषाला निवृत्त करण्यासाठी कधी कधी शब्दरुपी थापटणी गुरु शिष्याला मारतात. खरा शिष्य ते सर्व सहन करतो, परंतु अहंकारी शिष्य मात्र सहन करू शकत नाही. त्याला गुरुदेव जणू त्याचे वैरी वाटतात. त्यामुळे तो जीवनात काही उन्नती करू शकत नाही. किंवा जगावर काही तो उपकार करू शकत नाही. त्याची अवस्था कच्च्या घड्याप्रमाणे होते. म्हणून कबीर महाराज म्हणतात. '' घडी घडी कढे खोट '' नेहमी नेहमी शिष्यामध्ये काय दोष आहे हे गुरु बघत असतात व ते निवारण करत असतात. अशा वेळेस ते जरी शब्दरुपी थापटणे मारत असले तरी कृपा रुपी सहारा देखील देत राहतात. हे ज्या सद्शिष्याला कळते त्याचा उद्धार होतो तो भवसागर तरूण जातो.

महाभारतात एक कथा येते उपमन्यू नावाचा शिष्य धौम्य ऋषीने



त्याला ज्ञान न देता गायीची सेवा करण्यासाठी म्हणजेच गायी सांभाळण्याचे सांगितले. उपमन्यू गायी सांभाळायला लागला. परंतु त्यांच्या जेवणाची काहीही व्यवस्था केली नाही. भिक्षा मागून तो जेवन करायचा व गायी सांभाळायचा. एक दिवस विचारले की उपमन्यू तू जेवण काय करतोस? उपमन्यू म्हणाला महाराज मी भिक्षा मागून जेवतो? धौम्य ऋषी म्हणाले गुरुला भिक्षा न देता तू जेवतो हे ठीक नाही. जी भिक्षा मागतो ती मला आणून दे. उपमन्यू भिक्षा मागून गुरुला देऊन गायी सांभाळू लागला. परंतु काही दिवसाने विचारले. तू काय जेवतोस. उपमन्यू म्हणाला महाराज पहिली भिक्षा आपणास देऊन परत दुसरी भिक्षा मागून खातो. धौम्य ऋषी म्हणाले, दुसऱ्या वेळेस भिक्षा मागने चांगले नाही. त्या मुळे दुसऱ्या वेळेस भिक्षा मागणे बंद केले. खूप भुख लागली रुईचा चिक, दूध म्हणून पिण्यास गेला. चिक डोळयात गेला. आंधळा झाला. एका विहिरीत पडला. गायी आश्रमात आल्या. उपमन्यूचा शोध करत धौम्य ऋषी गेले. विहिरीत उपमन्यू सापडला. अश्वीनी कुमाराचे स्मरण करण्यास सांगितले अश्वीनी कुमार आले. एक पदार्थ खाण्यास दिला. तो उपमन्यूने खाण्यास नाकारले. म्हणाला गुरुला अर्पण केल्याशिवाय आता खाणार नाही. अश्वीनी कुमार म्हणाले एक वेळेस तुझ्या गुरुंने देखील आपल्या गुरुला समर्पित न करता हा पदार्थ खाल्ला होता. उपमन्यू म्हणाला माझ्या गुरुने काय केले हे पाहण्याचा अधिकार मला नाही. गुरुने जो आदेश दिलेला आहे. तो पाळणे हेच आता माझे कर्तव्य आहे. हे ऐकून अश्वीनी कुमार व गुरु प्रसन्न झाले सामान्य चक्षू तर दिलेच, परंतु ज्ञान चक्षूही दिले. वेदाभ्यास न करताच सर्व वेदांचे ज्ञान प्राप्त झाले. म्हणून त्या गुरु-शिष्याची अजून किर्ती आहे व अनंत काळापर्यंत राहील. '' मरावे

परी किर्ती रुपे उरावे '' असे वाटत असेल तर त्यासाठी गुरुला मने, काये, वाचे शरण गेले पाहिजे.

म्हणून या जगात सुख समाधान आणि परलोकामध्ये सद्‌गती हवी असेल तर त्यासाठी काय केले पाहिजे हे अभंगाच्या चौथ्या चरणामध्ये संत बहेणाबाई सांगते...

**बहेणी म्हणे जीवी होशील संतुष्ट । सद्‌गुरु वरिष्ठ पुजलीया ।।**

सर्वात जे वरिष्ठ आहे अशा सद्‌गुरुच्या पुजनाने जीव संतुष्ट होतो. परंतु त्यासाठी अपार श्रद्धा सद्‌गुरुवरती पाहिजे.

ज्याची गुरुवरती श्रद्धा असेल तर त्याचे सर्व कार्यही होते व किर्ती ही राहते. त्याला जे साध्य करायचे असेल ते साध्य होते. त्यामुळे तो संतुष्ट होतो. त्यासाठी ज्ञानेश्वर महाराज उदाहरण देतात.

**श्री गुरुचेनी नावे माती । डोंगरी जयापासी होती ।**
**तेणे कोळीये त्रिजगती । एकवद केली ।।**

एकलव्य धनूर्विद्या शिकण्यासाठी द्रोणाचार्याकडे आला. धनुर्विद्या शिकविण्यासाठी त्याने द्रोणाचार्यांना विनंती केली. परंतु द्रोणाचार्यांनी सांगितले की, मी कौरव पांडव राजपुत्रांव्यतिरीक्त इतरांना विद्या शिकविणार नाही असे वचन दिलेले आहे. त्याच प्रमाणे अर्जुनासमान दुसरा श्रेष्ठ धनुर्धर मी तयार करणार नाही असेही मी वचन दिलेले आहे. त्यामुळे मी तुला विद्या शिकवू शकत नाही. असे कारण सांगून विद्या शिकविण्याचे नाकारले. त्याच वेळेस एकलंव्याने सांगितले की महाराज मी देखील आपल्या व्यतिरिक्त कुणाकडून विद्या शिकणार नाही. इतरांना गुरु मानणार नाही. असा मनोमन दृढ निश्चय केलेला आहे. तेव्हा आपण प्रत्यक्ष मला विद्या शिकवू शकत नसाल तरी काही हरकत नाही. मी मात्र आपल्यालाच गुरु माणून विद्या शिकेन आपण मला आशीर्वाद द्या. अशा प्रकारे त्यांना आशीर्वाद मागितला. द्रोणाचार्यांनी



त्याला आशीर्वाद दिला. एकलव्य गुरूचा आशिर्वाद घेऊन एका डोंगरात एकटाच चालल्या गेला. तेथे त्याने गुरु द्रोणाचार्यांचा जसा बनविता येईल तसा मातीचा पुतळा तयार केला व त्या पुतळयाला गुरुद्रोणाचार्य समजून विद्याभ्यास आरंभ केला.

अल्पावधित गुरुदेवावरच्या अपार श्रद्धेने एकलव्य ती धनुर्विद्या शिकला. जी धनुर्विद्या प्रत्यक्ष द्रोणाचार्य ज्यांना शिकवित होते त्यांना देखील प्राप्त झाली नाही.

हे त्या वेळेस समजले की, एक दिवस कौरव, पांडव ज्या वनात एकलव्य राहत होता त्या वनात द्रोणाचार्यांसोबत गेले. कौरव, पांडवाचे कुत्रे फिरत फिरत ज्या ठिकाणी एकलव्य एकाग्र चित्ताने गुरुदेवाच्या समोर बसून विद्याभ्यास करत होता तेथे गेले. एकलव्याला बघून कुत्रे भूंकायला लागले त्याच्या भूंकण्यापासून विक्षेप होऊ नये म्हणून एकलव्याने असे बाण मारले की बाणाने कुत्र्याचे तोंड सर्व भरले. परंतु एकही बाण लागून कुत्र्याला इजा पोहचली नाही. सर्व तोंडामध्ये बाण भरण्यामुळे त्याचे भूंकणे बंद झाले व ते कुत्र कौरव पांडवाकडे आले. त्या कुत्र्याला बघितल्यानंतर सर्वांना मोठे आश्चर्य वाटले की, असा कोण धनुर्धर आहे की बाण मारून कुत्र्याला एक ही बाण न लागू देता कुत्र्याचे तोंड बाणाने भरून त्याचे भुंकने बंद केले. कुत्र्याच्या पाठीमागे ते गेल्यानंतर त्यांना एकलव्य दिसला. तेव्हा त्यांनी त्याला विचारले की ही विद्या तू कुणापासून शिकला त्याने सांगितले, माझ्या गुरुदेव द्रोणाचार्यांपासून.

आपल्यापेक्षा हा श्रेष्ठ धनुर्धर होऊ नये म्हणून कौरव, पांडवांनी गुरुदक्षिणा म्हणून उजव्या हाताचा आंगठा द्रोणाचार्यांना एकलव्याकडे मागून घेण्याची विनंती केली. त्या प्रमाणे द्रोणाचार्यांनी उजव्या हाताचा आंगठा मागून घेतला. एका क्षणाचाही विलंब न करता

एकलव्याने उजव्या हाताचा अंगठा कापून दिला. व अत्यंत आनंद वाटला कारण....

**यह तन बिषकी बेलरी गुरु अमृत की खान ।**
**शिष दिये ज्यो गुरु मिले तो भी सस्ता जान ।।**

शिर जरी कापून दिले आणि त्या बदल्यात गुरु मिळाले तर समजावे खूप स्वस्तात गुरु मिळाले. यांनी तर केवळ आंगठाच मागितला.

आतापर्यंत एकलंव्याच्या विद्येत जी कमतरता होती ती देखील दक्षिणा दिल्यामुळे पूर्ण झाली. अगंठा नसल्यानंतर हा बाण मारू शकणार नाही असा जो एकलव्याची इर्ष्या करणाऱ्यांमध्ये भ्रम होता तो सर्व निरर्थक झाला कारण अंगठा नसल्यानंतर देखील पहिल्या पेक्षा जास्त धनुर्विद्येत तो पारंगत झाला व पुजनाने दक्षिणा दिल्याने तो संतुष्ठही झाला. परंतु अशी गुरुची भक्ती करणे ऐवढे सोपे नाही. कबीर महाराज म्हणतात...

**भक्ती दुहेली गुरुन की नही कायर का काम ।**
**सिर उतारे हाथ सो तोहि मिले निजधाम ।।**

गुरुची भक्ती दुहेली म्हणजे अत्यंत कठीण आहे. स्वतःच्या हाताने शिर कापून गुरूला देण्यासाठी जो नेहमी तयार असतो त्याला निजधाम म्हणजे मोक्ष मिळतो.

म्हणून या जगात सुख संतुष्ट व परलोकात सद्गती हवी असेल तर त्यासाठी सर्वात जे वरिष्ठ आहे त्यांचे पूजन झाले पाहिजे. या जगात सर्वांत श्रेष्ठ, वरिष्ठ कोण असेल तर ते सद्गुरु आहे. जसे कबीर महाराज देखील म्हणतात...

**सद्गुरु सम कोई नहि सात दिप नौ खंड ।**
**तीन लोक न पाईये अरू एकही ब्रम्हांड ।।**

सद्गुरु समान सात दिपांमध्ये, नवखंडामध्ये, तीन लोकामध्ये



एवढेच काय एकवीस ब्रह्मांडामध्ये कुणीही नाही. म्हणून या जगात सुख आणि परलोकामध्ये सद्गती हवी असेल तर त्यासाठी एकच उपाय आहे. तो म्हणजे कबीर महाराज सांगतात....

**कंचन मेरू अरपही अरपै कनक भांडार ।**
**कहै कबीर गुरु बैमुखी कबहु न पावै पार ।।**

भलेही सुमेरु पर्वताएवढे सुवर्ण दान करा किंवा रत्नाचे भांडार अर्पण करा. परंतु निगुरा, बिना गुरुचा या भवसागरापासून मुक्त होऊच शकत नाही.

म्हणून जे ज्ञानी असतात ते या भवसागरापासून मुक्त होण्यासाठी सद्गुरुच्या सानिध्यात जातात. त्यांचा उपदेश श्रवण करतात. त्यांची भक्ती करतात. कारण सद्गुरुशिवाय कुणी या भवसागरातून मुक्त होऊच शकत नाही. जसे भगवान विष्णूचे वाहन गरुड काकभुशूंडीसारख्या सद्गुरुच्या सानिध्यात गेले ते आपला अनुभव सागंतात...

**गुरुबिन भवनिधी तरई न कौई । ज्यो बिरची संकर सम होई ।।**

गुरुशिवाय या भवनदितून, भवसागरातून कुणी तरुच शकत नाही. भलेहीब्रह्मदेवा समान त्यांच्या जवळ सृष्टी उत्पन्न करण्याचे सामर्थ असेल किंवा भगवान शंकरासमान ज्ञानी असेल तरी परंतु एवढे सामर्थ्य किंवा ज्ञान असूनदेखील सद्गुरुशिवाय ते या भवसागरातून मुक्त होऊच शकत नाही. म्हणून जे ज्ञानी असतात ते संत, भगवंत देखील गुरु करतात. गुरुभक्ती करतात गुरुसेवा करतात...

म्हणून समर्थ रामदास स्वामी म्हणतात...

**श्रीरामकृष्ण आदिकरुनी । अति तत्पर गुरुभजनी ।**
**सिद्ध साधू आणि संतजनी । गुरु दास्य केले ।।**

सिद्ध साधू-संत गुरु करून त्यांची सेवा करतात. त्याच प्रमाणे भगवान राम कृष्ण देखील गुरूच्या सानिध्यात जातात. त्यांचा उपदेश श्रवण करतात. त्यांची सेवा करतात.

म्हणून आपण देखील सद्‌गुरुच्या सानिध्यात गेले पाहिजे. त्यांचा मंत्रानुग्रह घेतला पाहिजे. त्यांची सेवा केली पाहिजे. हे सर्व केल्याने काय होते? तर भगवंत म्हणतात...

**गुरु ज्यावरी अनुग्रहो करी । त्यासी मी भगवंत उद्धरी ।**
**आदरे वाहूनिया शिरी । निज ऐश्वर्यावरी बैसवी ।।**

गुरू ज्यांच्यावर अनुग्रह म्हणजेच कृपा करतात त्याचा मी स्वतः भगवंत उद्धार करतो. कसा उद्धार करतो? तर म्हणतात आदराने माझ्या शिरावर त्याला वाहून स्वतःच्या ऐश्वर्यावरती बसवितो.एव्हढेच नव्हे तर अजून भगवंत म्हणतात...

**गुरु परमात्मा परेशू । ऐसा ज्यांचा दृढ विश्वासू ।**
**त्यांचा अंकीला मी ऋषीकेशू । जो जगदेशू जगाचा ।।**

गुरु आणि परमात्मा दोन्ही एकच आहे. एव्हढेच नव्हे तर ...

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णूगुरुर्देवो महेश्वरः ।**
**गुरुः साक्षात्परं ब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः ।।**

गुरुच ज्ञान उत्पन्न करणारे ब्रह्मदेव स्वरुप, ज्ञान टिकविणारे, स्थिर करणारे विष्णू स्वरुप व अहंकाराचा नाश करणारे महेश्वरःस्वरुप एव्हढेच नव्हे तर परब्रह्म स्वरुप आहे. असा ज्यांचा विश्वास आहे. मी जगाचा ईश्वर असलो तरी अशा साधकांच्या, शिष्यांच्या, भक्तांच्या आधिन राहतो.

परंतु जे गुरुला माझ्या समान किंवा ब्रह्मस्वरुप मानत नाही अशांची काय अवस्था होते तर भगवंत म्हणतात...



**त्या गुरुचे करुनी हेळण । जो करी माझे भजन ।**
**तेणे विखेसी मिष्ठान्न । मज भोजन घातले ।।**

किंवा

**तोंडीघास डोई टोला । ऐसा भजनार्थ तो झाला ।**
**तो जाण सर्वस्वे नागवला । वैरी आपला आपणची ।।**

गुरुची अवहेलना करतो, निरादर करतो व माझी पूजा करतो,माझे भजन करतो तर त्या पुजनाने, भजनाने मी प्रसन्न होत नाही, त्याचे भजन मला त्या प्रमाणे वाटते जसे, एखादा विष घालून भोजन देतो किंवा भोजन देऊन डोक्यावर एक टोला मारतो त्याने जसा भोजन घेणारा प्रसन्न होत नाही त्याच प्रमाणे गुरुचा अनादर करून माझे भजन, पूजन करणाऱ्यावरती मी प्रसन्न होत नाही.

म्हणून भगवंत प्रसन्न व्हावे असे वाटत असेल तर सद्‌गुरुची भक्ती सेवा केली पाहिजे. कारण...

**'' परब्रह्म राम वशिष्ठा शरण । कृष्ण सांदिपणी गुरु केला ।।''**

स्वतः परमात्मा देखील सद्‌गुरुची सेवा, भक्ती करतात. म्हणून प्रत्येकाने गुरु केले पाहिजे व त्यांची भक्ती केली पाहिजे. जर सद्‌गुरुची भक्ती केली नाही तर काय होते? तर कबीर महाराज म्हणतात.

**कबीर गुरु की भक्ती बिन नारी कुकरी होय ।**
**गली गली भूकत फिरै टूक न डारे कोय ।।**

जी नारी म्हणजे स्त्री गुरुची भक्ती करत नाही, ती पुढच्या जन्मी कुत्री होते. अशी कुत्री की जी गल्लोगल्ली भुंकत फिरते. परंतु तिला खाण्यासाठी कुणी भाकरीचा तुकडा टाकत नाही. असे ऐकल्यानंतर कदाचित कुणाच्या मनामध्ये संदेह निर्माण होऊ शकतो की, कबीर महाराज म्हणतात जी स्त्री गुरु करत नाही, गुरुभक्ती

करत नाही ती स्त्री जर कुत्री होते तर आमच्या गावात बऱ्याच स्त्रिया आहे की त्या गुरुभक्ती करत नाही. आणि त्या जर कुत्र्या होतात तर तेवढ्या कुत्र्या तर आमच्या गावात, भागात दिसत नाही. तेव्हा कबीर महाराजांनी जे सांगितले ते सत्य कसे मानावे? थोडासा विचार केल्यानंतर कबीर महाराजांनी जे सांगितले ते सत्य आहे याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही. कारण बऱ्याच स्त्रियांचे आचरण कुत्रीसारखेच असते. बऱ्याच स्त्रिया एकमेंकीला भांडतांना म्हणतात देखील काय भुंकती कुत्री सारखी? कुत्री मेली. कुत्री सारखी भुंकतच राहती.

बऱ्याचशा पुरुषांनी बघितले देखील असेल की, काही स्त्रियांचे जीवन कुत्रीसारखेच असते. कधी सकाळीच ब्रह्ममुहूर्तात उठत नाही. पती परमात्मा समजून त्यांच्या स्नानाची व्यवस्था करत नाही. मुलांना चांगले संस्कार देत नाही. सडासमार्जन, साफसफाई पूजापाठ तर कधी माहीतच नाही. आपले आई-वडील सोडले, आता सासू-सासरे हेच आपले आई-वडील आहे असे मानत नाही व त्यांची सेवा करत नाही. काहीही कारण नसतांना इकडे-तिकडे फिरत राहते. थोड्या थोड्या कारणाने कुणाशीही भांडतच राहते अशा स्त्रियांचे जीवन कुत्रीसारखे नाही तर काय आहे?

परंतु ज्या स्त्रियांनी अनुग्रह घेतला म्हणजेच गुरु केला. गुरुभक्ती ज्या स्त्रिया करतात त्यांचे जीवनही आपण बघितलेच असेल की अशा स्त्रिया सकाळीच ब्रह्ममुहूर्तात उठतात. स्वतः स्नान करतात. पती परमात्मा समजून त्यांच्या स्नानाची व्यवस्था करतात. मुलांना चांगले संस्कार देतात. सडासमार्जन घरादाराची स्वच्छता करतात. सासू-सासऱ्यांची देखील यथामती यथाशक्ती आई वडीलाप्रमाणे सेवा करतात. विनाकारण कुठे भटकत नाही. गुरुमंत्राचा मानसिक जप करत भगवंताचे चिंतन, स्मरण करत स्वयंपाक बनवतात. तर त्यांचा स्वयंपाक-स्वयंपाक



न राहता नैवेद्य होतो, प्रसाद होतो. जे असा नैवेद्य किंवा प्रसाद सेवन करतात, त्या घरात आनंद राहतो. एवढेच नव्हे तर साक्षात परमेश्वर अशा मातेच्या हाताने बनविलेल्या प्रसादाची इच्छा करतो व अशा मातेच्या गर्भात भक्त, संत, भगवंत रुपाने येण्याची इच्छा करतो. म्हणून प्रत्येक स्त्रीने गुरुभक्तीची सद्‌गुरुज्ञानाची प्राप्ती करून घेतली पाहिजे.

कबीर महाराजांनी गुरुभक्ती न करणाऱ्या स्त्रीची जसी दुर्गती सांगितली, त्याच प्रमाणे जे पुरुष गुरुभक्ती करत नाही त्यांची कशी दुर्गती होते हे सांगतांना म्हणतात...

**कबीर गुरु की भक्तीबिन राजा रासभ होय ।**
**माटी लदै कुंभार की घास न डारे कोय ।।**

जो पुरुष राजा जरी असेल सर्वकाही भोगऐश्वऱ्याचे साधन असेल परंतु गुरुभक्ती करत नसेल तर तो कुंभाराचा गाढव होतो व कितीही माती वाहून नेली तरी खायला मात्र घास मिळत नाही. बरेचसे लोक म्हणतात देखील, काय गाढव आहे? बऱ्याचशा लोकांचे जीवन गाढवा सारखेच असते. संसाराचा भार रात्रंदिवस वाहतात परंतु ऐवढा भार वाहून ही जीवनात सुख समाधान मिळत नाही. बरेचसे व्यक्ती पिऊ नये ते मद्य म्हणजेच दारू पितात.कोठेही काहीही बडबडतात व कुठेही लोळतात. अशांना बघून बरेच जण म्हणतात...
**'' वेळ ना वखत गाढव बसल भुकत ''** अशी गाढवासारखी आपली दयनिय अवस्था होऊ नये असे वाटत असेल तर त्यासाठी सद्‌गुरुची भक्ती केली पाहिजे. सद्‌गुरुपासून ज्ञान प्राप्त करून घेतले पाहिजे.

मानवाचा जो जन्म आपल्याला मिळालेला आहे, तो स्त्री चा असो किंवा पुरुषाचा असो त्या मानव देहाचे सार्थक करून घ्यावयाचे असेल तर त्यासाठी सद्‌गुरु केले पाहिजे. म्हणजेच सद्‌गुरुपासून

ज्ञान प्राप्त करून घेतले पाहिजे व मानव देहाचे सार्थक केले पाहिजे. त्यासाठी महापुरुष उपदेश करतात...

**सुनलो चतूर सुजान निगुरे नही रहना ।**

जर सुजान असाल, चतूर असाल, विवेकी असाल तर निगुरे राहू नका. सद्गुरु करा कारण....

**निगूरे का नहीं कहीं ठिकाणा । चौऱ्यांसिमे आना जाना ।**
**पडे नरक की खान ।।**

निगुऱ्याचा काहिही ठिकाणा नसतो. तो नेहमी चौऱ्यांशीच्या फेऱ्यात फिरत असतो. व शेवटी नरकाच्या खानीमध्ये पडत राहतो. निगुऱ्याची नेहमी दुर्गती होते. कारण.

**निगुरा होता हिय का अंधा । खूब करे संसार का धंदा ।**
**और करता अभिमान ।।**

निगुऱ्याला आपले हित कळत नाही. रात्रंदिवस संसाराचा धंदा करतो व थोडेसे यश मिळाले तर माझ्यामुळे हे सर्व झाले असा अभिमान करतो. अभिमानामुळे दुर्गती होते. जशी रावणाची झाली. अशी दुर्गती आपली होऊ नये असे वाटत असेल तर त्यासाठी सद्गुरू केला पाहिजे. त्यांचा बोध जीवनात पालन करून हा भवसागर तरला पाहिजे.

म्हणून ज्यांनी सद्गुरु केले नसेल म्हणजे जे अजून निगुरे असतील तर त्यांनी मनोमन निगूरे राहू नये असा निश्चय केला पाहिजे. म्हणजेच सद्गुरुचा बोध घेतला पाहिजे. व ज्यांनी सद्गुरु केले असेल तर त्यांनी मंजिल गाठण्याचा म्हणजेच मुक्त होण्याचा निजधामाला जाण्याचा रात्रंदिवस विचार केला पाहिजे.
म्हणून महापुरुष उपदेश करतात...



**सद्गुरु के प्रेमी मंजीलसे न घबराना ।**
**दिनरात नाम ही स्मरण करते जाना ।।**

हे सद्गुरु प्रेमी ! सद्गुरु वरती अपार श्रद्धा आसणाऱ्या साधका तुला मंजिल गाठायची आहे. म्हणजेच आपल्या धामाला, गावाला जायचे आहे. कारण जोपर्यंत तू आपल्या गावाला घराला पोहचत नाहीस तोपर्यंत तुला शाश्वत सुख, समाधान मिळणार नाही. म्हणून तू लवकरात लवकर आपल्या गावाला पोहच आपल्या गावाला जा असे ऐकल्यानंतर काही म्हणतील आम्हीतर आमच्या गावातच आहोत. आमच्या घरीच आहोत किंवा काही म्हणतील गावात घरात पोहचण काय अवघड आहे. ते आता आम्ही पोहचून जाऊ. आपण ज्या घराला गावाला आपले घर, गाव मानत आहात ते आपले गाव घर नाही. जर असते तर इतरांनी आपणास घरातून बाहेर काढले नसते. आपली इच्छा असो अगर नसो आपणाला आपण ज्या घराला, गावाला आपलं मानत आहात त्या घरातून, गावातून लोक बाहेर काढतीलच.

**सोडून गनगोत सारी । शेवटी गावाचे बाहेरी ।।**

अशी अवस्था एक दिवस आपली झाल्याशिवाय राहणार नाही. अशी अवस्था कित्येक जन्मापासून आपली होत आलेली आहे.जोपर्यंत आपण आपल्या गावाला पोहचत नाही तो पर्यंत अशीच आपली अवस्था होतच राहणार आहे. हे सर्व ऐकल्यानंतर आपल्या मनात संदेह निर्माण होऊ शकतो की आपले गाव नेमके कोणते आहे? तर महापुरुष सांगतात.. संतांचं, भगवंताचं गाव आपलं गाव आहे ज्या गावाला पोहचल्यानंतर जन्ममृत्यूच्या चक्रापासून जीव मुक्त होतो. अशा गावाला थोडेच भाग्यवान जाणतात जसे संत तुकाराम महाराज म्हणतात...

**आम्ही जातो आमच्या गावा । आमचा रामराम घ्यावा ।।**

तुकाराम महाराज देहूगावामध्ये म्हणतात.. आम्ही आमच्या गावाला निघालेलो आहे. तेव्हा आमचा शेवटचा रामराम, प्रणाम स्वीकार करा.

हे सर्व ऐकल्यानंतर परत मनात एक प्रश्न निर्माण होऊ शकतो की, संताचं भगवंताचें जे गाव आहे, तेच जर आमचं गाव आहे तर ते गावं कसं आहे. ज्यांनी समाधीच्या द्वारे बघितले असे कबीर महाराज म्हणतात.

**सन्तो ! सो निजदेश हमारा जहा जाय फिर लौट न आवे**
**भवसागर की धारा**

आमचं अस गाव आहे की, ज्या गावाला गेल्यानंतर जीव परत जन्ममृत्यूच्या चक्रात भ्रमण करत नाही. परत या जगामध्ये जन्म घेण्यासाठी त्याला यावं लागत नाही. अशा गावाच वर्णन करतांना ते म्हणतात...

**सूर्य चंद्र तहाँ प्रकाशित नाही नही नभ मंडल तारा ।**
**उदय न अस्त दिवस नही रजनी बीन ज्योती उजीयारा ।।**

त्या गावामध्ये सूर्य, चंद्र, तारामंडल प्रकाशित होत नाही. जेथे दिवस उगवतही नाही व मावळतही नाही. सूर्य, चंद्र, तारामंडल कसल्याही प्रकारच्या ज्योती नसतांना देखील त्या ठिकाणी प्रकाशही प्रकाश आहे. कारण सूर्य, चंद्र, तारे ज्याच्या प्रकाशाने प्रकाशमान होतात असं ते स्थान आहे.

अशा गावाला जाण्यासाठी हे जप, तप, अनुष्ठान किंवा जेवढे धार्मिक आयोजन प्रयोजन असेल ते सर्व याचसाठी आहे की, आपण आपल्या गावाला जाऊन मुक्त झालं पाहिजे.

अशा त्या दिव्य गावाला कसे जायचे त्याचाच उपाय महापुरुषांनी



सांगितला ''दिन-रात नाम ही स्मरण करते जाणा.'' रात्रंदिवस भगवंताच्या नामाचे स्मरण केले पाहिजे. सुरुवातीला माळीवरती म्हणजे माळ घेऊन जप केला पाहिजे. परंतु नंतर मात्र...

**माला श्वासोच्छ्‌वास की भगत जगत के बिच ।**
**जो फेरे सो गुरु मूखी ना फेरे सो नीच ।।**

एकांतात, लोकांतात भक्तासोबत असतांना किंवा दुर्जनासंगती असतांना जागृती, स्वप्नी, सुसुप्ती सर्व अवस्थेमध्ये भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे.

अनुष्ठान करून आपण उद्या आपण मानलेल्या गावी घरी जाणार आहात. तेव्हा एक गोष्ट लक्षात ठेवा की, येथे आपल्या भाग्याची सर्व सराहना करत होते. असंख्य पुण्यात्मा आपले दर्शन घेत होते. घरी गेल्यानंतर देखील असाच अनुभव आपणास येईलच असे नाही. घरी गावी गेल्यानंतर कदाचित काही उपहासपूर्वक विचारतील आला अनुष्ठान करून? आपण नम्रपणे उत्तर द्याल हो. परंतु दुर्जन उपहासपूर्वक परत विचारतील काय सांगितले गुरुने? आपण उत्तर द्याल नितीने न्यायाने मर्यादाने वागले पाहिजे. अखाद्य खाऊ नये. व्यसने करू नये. हे ऐकून दुर्जन म्हणतील. ''अरे खाऊन तर पाहा'' काय होते खाल्याने, व्यसने केल्याने? करून तर बघ, अशा प्रकारे त्यांच्या शब्द जाळामध्ये आपण गुंतले तर महान नरकाची प्राप्ती झाल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी महापुरुष सावधान करतात.

**दुनिया के लोग तुझको दिवाना बना देंगे ।**
**दुनिया के लोग तुझको मंजिलसे गिरा देंगे ।।**
**हरगिज नही घबराना पग पग बढतेही जाना ।।१।।**

जगात जास्तीत-जास्त लोक खेकड्याच्या जातीचे असतात. म्हणजेच एखाद्या डब्यात बरेच खेकडे ठेवले व त्याला झाकण नाही

लावले तरी एकही खेकडा वरती येत नाही कारण एखादा वरती येण्याचा ज्या वेळेस प्रयत्न करतो त्या वेळेस दुसरा त्याचा पाय खाली ओढत असतो. तीच अवस्था या जगातील असंख्य जीवाची आहे. एखादा सन्मार्गाला लागला की दुर्जन त्याला खाली खेचल्याशिवाय राहत नाही. एखादा पाय घसरून पडला तर त्याला हसणारे अनेक मिळतात. परंतु त्याला आधार देऊन सावरणारा एखादाच असतो. आपण नितीने, न्यायाने, धर्माने वागतां म्हणून लोकांनी आपली वेड्यात गणती केली तरी हरकत नाही. चांगला मार्ग आपण सोडता कामा नये.

काही साधकांची अशी चुकीची समजूत असते की, सद्‌गुरु मिळून जपाचा, तपाचा, अनुष्ठानाचा योग प्राप्त होनं अगदी सुलभ आहे. ताट, तांब्या, अंथरून, पांघरून घेऊन गेलो की खूप लोक सेवा करतात. परंतु वस्तूतः तसे नाही. पूर्वीच्या काही महान पुंण्याने सद्‌गुरु मिळत असतात व महान पुंण्यामुळेच लोक सेवा करत असतात. जसे महापुरुष म्हणतात...

**यह तेरा तकदिर था तुझे पुरे सद्‌गुरु मिले ।**
**जीवन की बगीया मे भक्ती के फुल खीलै ।**
**प्रभू नाम की दौलत से झोली भरते जाना ।।**

हे आपलं काही तरी पूर्व जन्माचं चांगलं भाग्य होतं त्यामुळे संपूर्ण लक्षणसंपन्न सद्‌गुरु मिळाले. तेव्हा जीवनरुपी बगीच्यामध्ये भक्तीचे फुल उमलले पाहिजे. भगवंताच्या नामाने आपली झोळी भरली पाहिजे.

अजून लक्षात ठेवण्यासारखी बाब म्हणजे.

**सद्‌गुरु को बसाके दिल में निश दिन काम करना ।**
**और शब्द ध्यान धरके भवसागर से पार तरना ।**
**ज्यो ज्यो बढते जाना त्यो त्यो झुकते जाना ।।**



सद्‌गुरुला म्हणजेच सद्‌विचारांना ह्दयामध्ये स्थान द्या. सद्‌गुरुच्या आचारविचारा प्रमाणे आपले जीवन घडवा. सद्‌गुरुचा बोध ध्यानात ठेवून भवसागर पार तरा. असे केल्याने आपली खूप किर्ती होईल. परंतु अशा वेळेस अहंकार येऊ देऊ नका की हे सर्व माझ्यामुळे झाले. ही सर्व सद्‌गुरुची कृपा आहे हे नेहमी लक्षात ठेवा. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवा की.

**प्रभू रुठे गुरु राखे गुरु रुठे ठौर नहीं ।**
**गुरु सेवक का रिस्ता रिस्ता और कोई न ही ।**
**इस रिश्ते को दासा भूकता करते जाना ।।**

भगवंत रुष्ट झाले तर सद्‌गुरु आपणास तारतील. परंतु सद्‌गुरु जर रुष्ट झाले तर या जगात अशी कोणतीच शक्ती नाही की, जी आपल्याला सद्‌गुरु रुष्टतेपासून वाचवू शकेल.

सद्‌गुरु रुष्ट केव्हा होतात? जसे या ठिकाणी अनुष्ठानाला सुरुवात होतांना जे अनुष्ठानाला बसतात त्यांना तीन, चार वेळेस नियम समजावून सांगितल्या जातात. त्या सर्व नियमांचे आम्ही पालन करू असा भगवंताच्या, ब्राह्मणांच्या, सद्‌गुरुच्या, सूर्य नारायणाच्या आणि अग्नीनारायणाच्या साक्षीने संकल्प केला जातो की, जोपर्यंत आम्ही जीवंत आहोत तोपर्यंत कोणत्याच प्रकारचे व्यसन करणार नाही. त्यामुळे समाज तनाने, मनाने, धनाने त्यांची सेवा करतात. सकाळ, संध्याकाळ दोन, तीन तास प्रवचन चालते. हे सर्व ऐकल्यानंतर देखील ज्या वेळेस एखादा म्हणतो की, दुर्जनाच्या संगतीत गेलो व त्याने आग्रह केला म्हणून पिलो, व्यसन केले व तेव्हापासून सर्व काम उलटेच व्हायला लागले. मी चुकलो मला क्षमा करा. अशा वेळेस त्याला काय उत्तर द्यावे हेच कळत नाही. समाजाने सद्‌गुरुने आपल्यासाठी ऐवढे केले आणि आपण सर्वांचा विश्वासघात

केला. त्या वेळेस गुरु रुष्ट होतात. असे गुरु रुष्ट होऊ नये यासाठी सावधान राहिले पाहिजे.

आपण अनुष्ठान करून गावी, घरी जात आहात म्हणजे आता सर्व सृष्टी आपल्यासाठी बदलेल असे नाही. आपली दृष्टी बदलून घेतली पाहिजे. ज्याने आपल्या जीवनाचे सार्थक होईल जसे..

**सुखमे न डूब जाना चरनों मे ध्यान देना ।**
**दुख आये समझ लेना यह है इम्तहान देना ।**
**सुख दुख मे सम रहना हरगिज नही घबराना ।।**

जीवनामध्ये सुख-दुःख, लाभ-हानी, जय-पराजय, मान- अपमान हे सर्व होतच राहतात. जसे आपली इच्छा असो, अगर नसो.हिवाळा, पावसाळा, उन्हाळा त्याचप्रमाणे दिवसरात्र हे सर्व चालूच राहणार आहे. आपण अनुष्ठान केले म्हणजे आता सृष्टी बदलेल असे नव्हे तर आपली दृष्टी बदलली पाहिजे. सुख आले तर भगवंताला विसरता कामा नये. दुःख आले तर आपली परिक्षा पाहण्यासाठी दुःख आलेले आहे अशी भावना मनात ठेवा. सुख-दुःख, लाभ-हानी, जय-पराजय सर्व समान मानून सर्व परिस्थितीमध्ये भगवंताचं चिंतन करा. सर्व चिंता दूर होऊन निश्चित आपले जीवन सुखी झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु त्यासाठी रात्रंदिवस भगवंताचं स्मरण, चिंतन केले पाहिजे. म्हणून भगवंताकडे प्रार्थना करा की, हे प्रभू आम्हाला सद्‌गुरु मिळू दे त्यांची ओळख होऊन तेथे श्रद्धा स्थिर होऊ दे व त्यांच्या मुखाने आम्हाला नाम मंत्र मिळून त्याचे रात्रंदिवस स्मरण होऊ दे. म्हणून प्रभू अशि कृपा करा....



**अब प्रभू कृपा करहू यही भाँती । सब तजी भजन करहू दिन राती ।।**
**जयती शिवा शिव जानकी राम । गौरी शंकर सीता राम ।।**
**जय रघुनंदन जय सीयाराम । ब्रज गोपी प्रिय राधेश्याम ।।**
**रघुपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ।।**
**श्रीराम जय राम जय जय राम । जय महारूद्र जय हनुमान ।।**
**विठ्ठल विठ्ठल पंढरीनाथ । जय शिव शंकर भोलेनाथ ।।**
**दुर्गती नाशिनी दुर्गा माँ । काल विनाशिनी काली माँ ।।**
**आदि शक्ती भवानी माँ । भव भय भंगसी भांगसी माँ ।।**

**ॐ नमः पारबती पतये हर हर महादेव**
**गोपाल कृष्ण भगवान की जय**
**श्री गुरूदेव दत्त दत्त दत्त अलख निरंजन**
**सद्‌गुरु जनार्दन स्वामी महाराज की जय**
**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज की जय**

## स्वामीजींचे जपानुष्ठान काळातील सत्संग - प्रवचन

# पुस्तके, व्ही.सी.डी.

| दिवस | सकाळ | रात्री |
|---|---|---|
| १ ला | जन्म - मृत्यू चक्र निवृत्ती | मायाजाळा पासून मुक्ती |
| २ रा | प्रातःकाळी उठावे | संसार सागरातून मुक्ती |
| ३ रा | नाम जपाची विधी | करावे तसे भरावे |
| ४ था | ध्यानाची विधी | नाम जपाने मुक्ती |
| ५ वा | भोजनाने भक्ती | संत संगतीने मुक्ती |
| ६ वा | असाध्य ते साध्य | दानाने सद्‌गती |
| ७ वा | पाप निवृत्ती उपाय | सद्‌गुरु वचनामृताने मुक्ती |
| ८ वा समाप्तीचा दिवस | प्रवृत्ती निवृत्ती मार्ग | नित्यकर्म - अनुष्ठान महिमा |